SET-B

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.**

**Exam B.A-I, Sem-I**

**अभ्यासपत्रिका क्र.-01 (DSC-A13)**

**अक्षरबंध (71262)**

**Day & Date : Thursday 16/02/2023 Time:10:30 A.M to 12:30 P.M एकूण गुण : 50**

**1) सर्व प्रश्न आवश्यक**

**2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

## प्रश्न १ ला. योग्य पर्याय निवडा. १०

१. 'शहरात नाही कुणावर विश्वास, प्रत्येक हालचालीवर असतात सीसी टीव्ही कॅमेरे लक्ष ठेऊन' असे कवीने कोणत्या कवीतेत म्हंटले आहे?

अ) राग ब) भविष्य क) तडजोड ड) पर्सनल मुलाखत

२. 'पर्सनल मुलाखत' कवितेत कवीला कोणता मुद्दा कळीचा वाटतो?

अ) जातधर्म ब) नोकरी क) बेकारी ड) व्यवसाय

३. 'पर्यावरण' या कवितेत व्हेंटिलेटरवर कोण आचके देत आहे' असे कवीला वाटते?

अ) दोस्ती ब) देश क) धर्म ड) ज्ञान

४. 'मांजर' या कवितेत खूपच दयाळू आहे असे कोणाला म्हंटले आहे?

अ) खाटिक ब) ईश्वर क) शिक्षक ड) संत

५. 'कोणाच्या आईने जन्म घ्यावा हजार वेळा' असे कवी लोकनाथ यशवंत म्हणतात.

अ) राईट बंधूच्या ब) मार्कोनीच्या क) एडिसनच्या ड) मायकल फ्रॅरडे

६. 'बाकी सर्व ठीक आहे' हा कवितासंग्रह कोणत्या कवीचा आहे?

अ) लोकनाथ यशवंत ब) नामदेव ढसाळ क) कवी केशवसुत ड) कवी नारायण सुर्वे

७. 'जिवाचा आटापिटा' या कवितेत कवीने कोणता प्रश्न मांडला आहे?

अ) जात ब) महागाई क) गरीबी ड) शेतकऱ्यांचा

८. कुपोषित बालकांचे बकाल जीवन कोणत्या कवितेत व्यक्त झाले आहे?

अ) राग ब) जिवाचा आटापिटा क) भविष्य ड) पर्यावरण

९. 'एका वृक्षाची गोष्ट' या कवितेत कवीचा मित्र कवीला कोणत्या वृक्षाचे बोन्साय भेट देतो?

अ) वड ब) आंबा क) पिंपळ ड) फणस

१०. 'हे जीवन सुंदर आहे' या कवितेत लग्नाच्या धामधुमीत प्राण सोडलेल्या आजीचे नाव सांगा.

अ) सखुबाई ब) शारदा क) वासंती ड) राधाबाई

**प्र. २ रा. अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न.** **१०**

१. आंबेडकरी विचारांचा प्रभाव कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेवर पडला आहे. या विधानाची समर्पकता सांगा.

**किंवा**

२. लोकनाथ यशवंत यांनी 'भविष्य' या कवितेत भविष्य सांगणारी व ते बघणारी वृत्ती समाजात आढळते याचे चित्रण कसे केले आहे ते सांगा.

**प्र. ३ रा. अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न.** **१०**

१. लोकनाथ यशवंत यांच्या 'जिवाचा आटापिटा' या कवितेतील जात विषयाची दाहकता विशद करा.

**किंवा**

२. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील महानगरीय जीवनातील वास्तव रेखाटा.

**प्र. ४ था. अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न (को.२)** **१०**

१. वृत्तपत्रातील अग्रलेखाचे महत्त्व सांगा.
२. नाटक परीक्षणाची लेखनपद्धती स्पष्ट करा.
३. बातमीदाराचे गुण सांगा.

**प्र. ५ वा. अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न (को.२)** **१०**

१. पत्रलेखनाचे प्रकार.
२. पत्रलेखन स्वरूप स्पष्ट करा.
३. आकलन प्रक्रियेचे स्वरूप.
४. उतारा/कविताचे आकलन.

-------------------------------------